**दिनांक २४/०१/२०२२ रोजी मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी , गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त**

सभेत खालीलप्रमाणे अधिकारी व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी हजर होते-

१) श्री. व्ही. आर. ठाकूर, जिल्हा व्यवस्थापक, म. फुले महामंडळ
२) श्री एस. एन. गायकवाड, महिला औद्यगिक विकास महामंडळ, उपविभाग, गोंदिया
३) श्री. गु. रा. पंधरे, सरकारी कामगार अधिकारी, गोंदिया
४) श्री. म. या. क्षिरसागर, प्रतिनिधी, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया
५) हुकुमचंद अग्रवाल, MIDC असोसिअशन, अध्यक्ष
६) श्री. नीरज जागरे, DDM, नाबार्ड, गोंदिया
७) श्री. पी. जी. नेवारे, राज्यकर अधिकारी, जी. एस. टी. कार्यालय, गोंदिया
८) श्री. गजानन अग्रवाल, अध्यक्ष लाख असोसिएशन, गोंदिया
९) श्री. नंदकिशोर साखरे, उद्योजक, सालेकसा
१०) श्री. पवन मेश्राम, कृषी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, गोंदिया
११) श्री. मनोहर ग्यानीराम उईके, आदिवासी स्वयंकला संस्था सालेकसा
१२) श्री. कुशल चोपडा, नाकोडा गारमेंट
१३) श्री. एच. के. बदर,महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया

**१. <u>गोंदिया जिल्ह्यात ICD स्थापन करणे</u>** – राईस मिल इंड. असोसिएशन गोंदिया यांनी गोंदिया जिल्ह्यात Inland Containe Depo ( ICD) स्थापन करण्याची मागणी अनुषंगाने महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांनी Container Corporation of Indi ( CONCOR ) यांचेशी चर्चा केली असता त्याकरिता जवळपास ३० एकर जागा ज्याची लांबी किमान ७०० मीटर असेल याच आवश्यकता असल्याचे सांगितले. गोंदिया स्टेशनजवळ एवढी जागा उपलब्ध नसल्यामुळे हिरडामाली स्टेशन जवळ ICI उभारला जाऊ शकतो, त्याकरिता जागा उपलब्ध करून देण्याकरिता MIDC ने कार्यवाही करण्याविषयी मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.

**२. <u>बांबू हस्तकला व गोंडी पेंटिंग</u>** – जयसेवा हस्तशिल्पकला संस्थेचे नंदकिशोर साखरे व उईके शिल्पग्राम सालेकसा चे मनोहर उईके यांनी हस्तशिल्पकला व गोंडी पेंटिंग निर्यातीस वाव असल्याचे सांगितले. त्यांनी भारतातील अनेक शहरात आयोजित हस्तशिल्प प्रदर्शनामध्ये सहभागी होऊन मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याचे सांगितले. श्री. उईके यांनी हस्तशिल्पकरित प्रदर्शनी केंद्र स्थापन करण्याची मागणी केली. मा. अध्यक्षांनी तहसीलदार यांचेशी चर्चा करून प्रदर्शनी हॉल करिता जाग उपलब्धतेबाबत तपासणी करण्यास सांगितले.

**३. <u>गारमेंट उत्पादन</u>** – श्री. कुशल चोपडा यांनी गारमेंट उत्पादन निर्यातीस वाव असल्याचे सांगितले. परंतु उत्पादनाकरीता कुशल कारागिरांची स्थानिक पातळीवर कमतरता असल्याचे सांगितले. मा. अध्यक्षांनी उमेद व महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेशी समन्वय साधून कुशल कारागिरांची समस्या सोडविण्याबाबत निर्देश दिले.

**४. <u>लाख उत्पादने</u>** – श्री. गजानन अग्रवाल यांनी लाख उत्पादनाच्या निर्यातीकरिता कारागिरांना प्रशिक्षणाचे गरज असून प्रशिक्षित तज्ञांमार्फत प्रशिक्षण देण्याची मागणी केली. मा. अध्यक्षांनी प्रशिक्षणाविषयी योग्य ते कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया

मा. अतिरिक्त जिल्हा अधिकारी,
गोंदिया

मा. जिल्हाधिकारी,
गोंदिया